दि. १७ फेब्रुवारी २०२६
मंगळवार
वर्ष ४ थे
अंक १०४
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

# दैनिक अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे
ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in

### आजचे पंचाग

- दिनांक : १७ फेब्रुवारी २०२६
- वार : मंगळवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : फाल्गुन
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : त्रयोदशी द्वादशी तिथी (सायंकाळी ०५:०४ पर्यंत) त्यानंतर चतुर्दशी तिथी
- नक्षत्र : उत्तराषाढा नक्षत्र (सायंकाळी ०७:४७ पर्यंत) त्यानंतर श्रवण नक्षत्र
- योग : व्यातीपात योग (१५ फेब्रुवारी पहाटे ०२:४६ पर्यंत) त्यानंतर वरीयान योग
- करण : वाणीजा करण (सायंकाळी ०५:०४ पर्यंत) त्यानंतर विस्ती भद्रा करण
- चंद्र राशी : मकर राशी
- सूर्य राशी : कुंभ राशी
- अशुभ मुहुर्त:
- राहु काळ : सायंकाळी ०५:११ ते सायंकाळी ०६:३७ पर्यंत
- शुभ मुहुर्त:
- अभिजित : दुपारी १२:३० ते दुपारी ०१:१६
- सूर्योदय : सकाळी ०७:०८
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:३७
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

## राजस्थानातील आगीत ८ जणांचा मृत्यू; पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला शोक

नवी दिल्ली: राजस्थानच्या अलवार जिल्ह्यातील भिवाडी औद्योगिक क्षेत्रात सोमवारी एका बेकायदेशीर फटाका कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत किमान ८ कामगारांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून अजूनही दोन कामगार कारखान्यात अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेवर पंतप्रधान मोदी यांच्याकडून शोक व्यक्त करण्यात आला आहे.

काय म्हणाले पंतप्रधान मोदी ?

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, राजस्थानमधील भिवाडी येथील ही आगीची घटना अतिशय दुःखद आहे. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले आहेत त्यांच्यासोबत माझ्या संवेदना आहेत. जे जखमी झाले आहेत त्यांना लवकर बरे वाटावे



यासाठी मी प्रार्थना करतो.

पंतप्रधानांसह मुख्यमंत्री भजनलाल शर्मा आणि माजी मुख्यमंत्री अशोक गहलोत यांनीदेखील शोक व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री भजनलाल शर्मा म्हणाले, खुशखेडा औद्योगिक क्षेत्रातील जीवितहानी अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या आत्म्यांना शांती आणि जखमींच्या लवकर बरे होण्याकरिता मी देवाकडे प्रार्थना करतो. ओम शांती.

माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत म्हणाले, भिवाडी (खैरथल-तिजारा) येथील रासायनिक कारखान्यात लागलेल्या भीषण आगीत ८ जणांचा मृत्यू अत्यंत दुःखद आहे. देव मृतांच्या आत्म्यांना शांती देवो आणि जखमींना लवकर बरे होवो.

ज्यावेळी ही दुर्घटना घडली, तेव्हा कारखान्यात सुमारे २५ कामगार उपस्थित होते.

(पान २ वर)

## प्रवासी आणि पादचाऱ्यांसाठी अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे करणार; मंत्री मंगलप्रभात लोढा

मुंबई : दक्षिण मुंबईतील पश्चिम रेल्वे वरील महत्वाची स्थानके लवकरच अतिक्रमण मुक्त आणि सुशोभित होणार आहेत. मुंबई सेंट्रल, ग्रांट रोड आणि चर्नी रोड स्थानकात लवकरच सरकते जिने बसवण्यात येणार असून स्थानकांचे सुशोभीकरणही करण्यात येणार आहे. कॅबिनेट मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी स्थानिकांसह आज चर्चगेट येथील पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयात मुख्य व्यवस्थापक श्री. विजयकुमार यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. या भेटीनंतर लवकरच स्थानिकांच्या तक्रारीनुसार योग्य कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कुमार यांनी सांगितले.

राज्याचे कॅबिनेट मंत्री श्री मंगलप्रभात लोढा यांनी दक्षिण मुंबईतील मुंबई सेंट्रल,ग्रँट रोड आणि चर्नी रोड स्थानक परिसरातील विविध समस्यांबाबत पश्चिम रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक श्री. विजयकुमार यांची भेट घेतली. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी घुसखोरी वाढत असून अनधिकृत फेरीवाल्यांचा विळखा पडला आहे. यातले अनेक फेरीवाले बांगलादेशी



रोहिंगे असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे स्थानक परिसरात अनधिकृत फेरीवाल्यावर कारवाई करावी. तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी गर्दुल्ले वावरताना दिसत आहेत. त्यामुळे प्रवाश्यांना आणि पादचार्यांनाही विनाकारण याचा उपद्रव सहन करावा लागत आहे. स्थानिकांच्या या समस्या गांभीर्याने घेऊन पश्चिम रेल्वेने याबाबत त्वरित कारवाई करावी अशी मागणी यावेळी मंत्री लोढा यांनी कुमार यांच्याकडे केली. त्याचबरोबर चर्नी रोड स्थानक ते गिरगावला जोडणारा पूल रखडला असून यातही रेल्वेने सहकार्याची भूमिका घ्यावी. त्याचबरोबर स्थानकात सरकते जिने बसवून वयोवृद्ध प्रवाश्यांना लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करून द्यावी असेही मंत्री लोढा यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पश्चिम रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक श्री. विजयकुमार यांनी समस्या जाणून घेतल्यानंतर यावर लगेचच अहवाल तयार करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत. हा अहवाल आल्यानंतर यावर त्वरित कार्यवाही करून प्रवाश्यांच्या समस्यांचे निराकरण करू असे सांगितले. स्थानकांच्या सुशोभीकरणाच्या प्रस्ताव ही प्रलंबित असल्याचे त्यांनी मान्य केले असून लवकरात लवकर स्थानकाचा परिसर स्वच्छ आणि सुशोभित करू असे आश्वासन दिले आहे.

या बैठकीला कौशिकजी शाह यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटनस्थळांची प्रचार प्रसिध्दी करावी; पर्यटनमंत्री शंभूराज देसाई

मुंबई : राज्यातील पर्यटनस्थळांची प्रचार प्रसिध्दी होण्यासाठी पर्यटन विभागाने काटेकोरपणे प्रसिद्धीचे नियोजन करावे. राज्यात, देशात व आंतरराष्ट्रीय स्तरावर राज्यातील पर्यटनस्थळांची प्रसिध्दी प्रभावीपणे करावी. डोंगरी महोत्सवाचे एप्रिल मध्ये आयोजन करावे, असे निर्देश पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे पर्यटन विभागाच्या विविध विषयाच्या अनुषंगाने बैठक झाली. त्यावेळी पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते. यावेळी पर्यटन विभागाचे



प्रधान सचिव संजय खंदारे,पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे उपस्थित होते.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, पर्यटन विभागातंर्गत विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येत आहे. आगामी कालावधीत डोंगरी महोत्सवाचे एप्रिल महिन्यात नियोजन करावे. या महोत्सवात स्थानिक संस्कृतीचे दर्शन घडविणारे कार्यक्रम, नामांकित कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम, कृषी पर्यटन, आई पर्यटन धोरणावर केंद्रित स्थानिक महिला सशक्तीकरण कार्यक्रमांचे आयोजन, गड-किल्ले दर्शन, विविध साहसी उपक्रम, पॅराग्लायडींग, पॅरामोटरिंग, रॉक क्लायबींग, सीप्लॅन राईड हे उपक्रम आयोजित करण्यात यावेत. स्थानिक ठिकाणी पर्यटनाला चालना देण्यासाठी हे उपक्रम असतील असे पहावे असे निर्देश त्यांनी दिले.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, राज्यातील ७५ पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पर्यटकांसाठी आधुनिक मुलभूत सोयी-सुविधायुक्त नमो पर्यटन केंद्र व माहिती सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत मान्यता देण्यात आली असून पहिल्या टप्प्यातील प्रतापगड, शिवनेरी, साल्हेर व रायगड येथील कामे गतीने करावीत. राज्यात नमो पर्यटन कौशल्य कार्यक्रमासाठी ७५०० प्रशिक्षणार्थ्यांपैकी प्रथम २५०० व उर्वरित ५००० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्याबाबतच्या कामाला गती देण्यात यावी, असे निर्देशही पर्यटनमंत्री देसाई यांनी दिले.

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीची घोषणा?

### थकबाकीदार शेतकऱ्यांची यादी शिंदे समितीकडे पाठवण्याच्या राज्य सरकारच्या सूचना

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकार आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा करण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती 'शिंदे समिती'कडे पाठवण्याच्या सूचना राज्य सरकारने सर्व बँकांना दिल्या आहेत. यामुळे येत्या ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पात राज्यातील बळीराजाला संपूर्ण कर्जमाफी मिळणार का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. राज्यातील विविध जिल्हा बँकांमार्फत जून २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, सचिव, बँकेचे



तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून हे संकलन सुरू आहे. या प्रक्रियेत सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य घेतले जात आहे. राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी ते २५ मार्च २०२६ या कालावधीत मुंबईत पार पडणार आहे. ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प मांडला जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास नेमकी किती आर्थिक तरतूद करावी लागेल, यासाठी ही अचूक आकडेवारी महत्त्वाची ठरणार आहे. प्रशासनातील सूत्रांच्या माहितीनुसार, पडताळणी पूर्ण झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर अंतिम शिक्कामोर्तब होऊ शकते.

**शेतकऱ्यांचे डोळे अधिवेशनाकडे**

राज्यात गेल्या काही काळापासून नैसर्गिक आपत्ती आणि शेतीमालाच्या दरातील चढ-उतारामुळे शेतकरी अडचणीत आहे.

(पान २ वर)

## शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे हजारो समर्थकांसह शिवसेनेत दाखल

मुंबई : लोहा-कंधारचे माजी आमदार तथा ज्येष्ठ



शेतकरी नेते शंकर अण्णा धोंडगे यांनी सोमवारी आपल्या हजारो समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुंबईतील 'नंदनवन' निवासस्थानी झालेल्या सोहळ्यात हा पक्षप्रवेश झाला. शिंदे यांनी शंकर अण्णा धोंडगे यांच्यासह त्यांच्या समर्थकांचे पक्षात स्वागत केले. धोंडगे यांच्या प्रवेशासाठी काँग्रेसकडूनही प्रयत्न झाले होते; मात्र अखेरीस त्यांनी शिवसेनेची निवड केली.यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, शिवसेना हा मालक-नोकरांचा नव्हे तर कार्यकर्त्यांचा पक्ष आहे.

(पान २ वर)

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मुंबईत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्यप्रयोग, पदयात्रा तसेच ऐतिहासिक वारसा जपणारे उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांमधून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, पराक्रम आणि लोककल्याणकारी कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित



करण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना मुंबई शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांनी केले आहे.

मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पदयात्रा आयोजनासंदर्भात मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे बैठक झाली. बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात, निवासी उपजिल्हाधिकारी

(पान २ वर)

## कुसुमाग्रजांच्या नाशिकमध्ये रंगणार चौथे विश्व मराठी संमेलन

नाशिक: जेष्ठ कवी कुसुमाग्रज यांचे वास्तव्य राहिलेल्या नाशिक शहरात चौथे विश्व मराठी संमेलन भरवण्यात येणार आहे. नाशिक शहराला साजेसे असेच चौथे विश्व मराठी संमेलन होईल. त्यासाठी सर्व नाशिककरांनी संमेलनाच्या यशस्वीतेसाठी पुढे यावे, असे आवाहन राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

**युवा पिढीसाठी विशेष उपक्रम:**

येत्या २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत हे संमेलन होईल. या संमेलनानिमित्त तीन दिवस विविध कार्यक्रम होतील.



त्यासाठी विविध समित्यांचे गठण करण्यात येईल. संमेलनादरम्यान मराठी भाषा व साहित्याचा विकास, जागतिकीकरणाच्या युगातील मराठीची भूमिका, तंत्रज्ञानातील मराठीचा वापर, शिक्षणातील मातृभाषेचे स्थान तसेच सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन या विषयांवर विविध परिसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने व संवाद सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहेत. तसेच संमेलनात कविसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरणे, नाट्यप्रयोग, कथाकथन, पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक संवाद तसेच युवा पिढीसाठी विशेष उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. मराठी साहित्य, कला व परंपरेचे दर्शन घडविणारी विविध प्रदर्शनेही या निमित्ताने भरविण्यात येणार आहे.

(पान २ वर)

## संस्कारक्षम पिढी घडवणे काळाची गरज : सौदागर तांदळे

### साने गुरुजी आयआयटी फाउंडेशन व बालविकास केंद्राचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



दै. अदिती एक्सप्रेस

लातूर - 'मुलांना केवळ अक्षर ओळख करून देणे पुरेसे नसून; त्यांना संस्कारक्षम बनवणे, श्रमाची सवय लावणे, आरोग्याची जाणीव करून देणे आणि पर्यावरण संवर्धनाची शिकवण देणे ही आजच्या काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी

साने गुरुजी आयआयटी फाउंडेशन व साने गुरुजी बालविकास केंद्र यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी केले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लातूर उपविभागीय कार्यालयातील नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख, माझं घर या अनाथ प्रकल्पाचे संस्थापक शरद झरे उपस्थित होते.

या प्रसंगी नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख व शरद झरे यांनी उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर संस्था सचिव सुरेखा माने, प्रकाश माने, प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने, उषा आडे आणि नागोराव कांबळे, आयआयटी फाउंडेशनच्या प्राचार्या यू. एस. देशमुख तसेच बालविकास केंद्राच्या प्रमुख वर्षा भगत उपस्थित होते.

(पान २ वर)

## नवोदय विद्यालयातील अनुष्का पाटोळे प्रकरण तापले; लातूरात महा आक्रोश मोर्चा, जिल्हाधिकाऱ्यांवर संताप

लातूर प्रतिनिधी : शहरातील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकातून निघालेल्या सकल मातंग समाजाच्या महा आक्रोश मोर्चाला प्रचंड प्रतिसाद मिळाला. नवोदय विद्यालयातील विद्यार्थिनी अनुष्का पाटोळे हिच्या मृत्यू प्रकरणात प्रशासनाच्या भूमिकेविरोधात मोर्चेकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. या वेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या कार्यपद्धतीवर घोषणाबाजी करत निषेध नोंदविण्यात आला.



मोर्चामध्ये अनुष्काच्या आईने भावनिक आक्रोश व्यक्त करत मुलीने आत्महत्या केली नसून तिचा खून झाल्याचा आरोप केला. अनुष्काला न्याय मिळावा, प्रकरणाची आत्महत्येकडे वळवणारी भूमिका थांबवावी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्यांनी परिसर दणाणून गेला. चार लाखांचा निधी दिल्याचे प्रशासनाचे विधान खोटे असल्याचाही आरोप करण्यात आला.

या मोर्चात जिल्ह्यातील व राज्यातून दलित समाजाच्या डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडिया, वंचित बहुजन आघाडी, लोकनायक सामाजिक संघटना, एबीएस फोर्स, लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र युवाशक्ती सेना, भीम आर्मी संघटना, वारणेचा वाघ मित्र मंडळ, युवा भिमसेना सोलापूर, विद्रोही संघटना, आधुनिक लहुजी सेना, भीम अण्णा सामाजिक संघटना, आर के ग्रुप, एकता ऑटो इंडियन सारख्या अनेक संघटना व संघटनेचे पदाधिकारी अजिंक्य चांदणे, गणपत भिसे, नगीनाताई

(पान २ वर)

# क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे

आज १७ फेब्रुवारी, स्वातंत्र्य संग्रामातील एक जहाल क्रांतिकारक तसेच क्रांतिकारकांचे गुरू वस्ताद लहुजी साळवे यांचा स्मृतिदिन. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी लाखो ज्ञात अज्ञात क्रांतिकारकांनी हौतात्म्य पत्करले त्यात वस्ताद लहुजी साळवे यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. वस्ताद लहुजी साळवे यांनी भारतमातेला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जे महान कार्य केले त्या कार्याची नोंद भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात सुवर्ण अक्षरांनी घ्यायला हवी होती मात्र दुर्दैवाने त्यांच्या कार्याची दखल इतिहासकरांनी घेतली नाही म्हणूनच त्यांच्या कार्याविषयी देशातील खूपच कमी लोकांना माहिती आहे. वस्ताद लहुजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदर किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पेठ या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राघोजी साळवे ( राऊत ) तर आईचे नाव विठाबाई असे होते. लहुजी साळवे यांचा जन्म शूरवीरांच्या घरात झाला. त्यांचे खापर पणजोबांवर शिवाजी महाराजांनी पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी दिली होती. त्यांचे वडील राघोजी साळवे हे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात शिकारखाना व शस्त्रागाराचे प्रमुख होते. लहुजींचे घराणे शूरवीर, लढवय्ये असल्याने लहुजीने देखील शूर बनावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती म्हणूनच त्यांनी लहुजींना लहानपणापासूनच शस्त्रांची आणि युद्ध कलेची तालीम दिली. त्यामुळे लहुजी घोडेस्वारी करणे, दांडपट्टा फिरवणे, भालाफेक करणे, बंदूक चालवणे, तोफगोळे फेकणे, गनिमीकावा करणे, शत्रूंची गुप्त माहिती गोळा करणे या युद्ध कलांत पारंगत झाले. ५ नोव्हेंबर १८९७ रोजी पेशव्यांचे इंग्रजांसोबत घनघोर युद्ध सुरू झाले. या युद्धात राघोजींसोबत तरुण लहुजीही सहभागी झाले. या युद्धात राघोजी लहुजी या बापलेकांनी प्रयत्नांची शर्थ केली मात्र या युद्धात राघोजींना वीरमरण आले. या युद्धात पेशव्यांचा पराभव झाला. वडिलांना वीरगती प्राप्त झाल्यावर लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली. भारतमातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी राघोजी साळवे शाहिद झाले त्या ठिकाणीच लहुजींनी १७ नोव्हेंबर १८१७ ला आपल्या वडिलांना श्रद्धांजली अर्पण करतना मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी अशी शपथ घेतली. इंग्रजांशी लढायचे असेल तर त्यासाठी जहालच व्हावे लागेल हे ओळखून त्यांनी तरुणांना जागृत केले. लहुजी साळवे यांनी पुण्यातील मुलांना युद्ध कलेचे शिक्षण देण्यासाठी पुण्यतिल रास्ता पेठेत देशातील पहिले तालीम युद्ध कौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरू केले. या प्रशिक्षण केंद्रात सर्व समाजातील तरुण सहभागी झाले. १८३९ साली इंग्रजांनी सातारचे छत्रपती प्रतापसिंह यांना गादीवरून हटवले. छत्रपती प्रतापसिंह यांना पदच्युत केल्याने तरुणांमध्ये इंग्रजांविरुद्ध चीड निर्माण झाली. याचा वचपा काढण्यासाठी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे यांनी महाराष्ट्रात तर उत्तरेत रंगोबापू यांनी लहुजींच्या मदतीने इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. १२ जून १८५७ ही बंडाची तारीख निश्चित करण्यात आली. मात्र बंडाची कुणकुण इंग्रजांना लागली व त्यांनी लहुजींसह अनेक क्रांतिकारकांना पकडले मात्र त्यामुळे इतर क्रांतिकारक चिडले व त्यांनी पुरंदरच्या मामलेदारांना ठार मारले. मामलेदारांच्या हत्येला जबाबदार ठरवून इंग्रजांनी कनय्या मांग व धर्मा मांग यांना तोफेच्या तोंडी दिले हे दोघेही लहुजीचे शिष्य होते. याच हत्येला जबाबदार ठरवून आणखी काही क्रांतिकारकांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. या क्रांतीकारकांना लहुजी साळवे यांनीच प्रशिक्षण दिले असा संशय असल्याने इंग्रजांनी लहुजी साळवे यांना अटक करण्यासाठी त्यांच्या पाठीमागे पोलिसांचा ससेमिरा लावला. पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी लहुजी साळवे हे वेषांतर करून भ्रमंती करू लागले या काळात त्यांनी सातारा, पन्हाळा या ठिकाणच्या दुर्गम भागात प्रशिक्षण केंद्र उभारली. या प्रशिक्षण केंद्रातून त्यांनी अनेक क्रांतिकारक तयार केले. १७ फेब्रुवारी १८८१ रोजी पुण्यातील संगमपूरच्या परिसरात एका झोपडीवजा घरात लहुजींची प्राणज्योत मालवली आणि एका महान क्रांतीपर्वाचा शेवट झाला. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी वस्ताद लहुजी साळवे शेवटच्या श्वासापर्यंत लढले आणि आपल्या सारखेच हजारो जहाल क्रांतिकारक निर्माण केले म्हणूनच त्यांना क्रांतिकरांचे गुरू असे म्हणतात. आज त्यांचा स्मृतिदिन मात्र आजही त्यांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला नाही हे आपले दुर्दैव. अर्थात याला आपले इतिहासकार देखील तितकेच जबाबदार आहेत त्यांनी वस्ताद लहुजी साळवे यांचे कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहचवले नाही. वस्ताद लहुजी साळवे यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# गवळी समाजाच्या दुधाभिषेकाने ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर देवस्थानच्या यात्रेचा शुभारंभ

## हर हर महादेवच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमला

लातूर /प्रतिनिधी : शनिवार व रविवारच्या मध्यरात्री गवळी समाजाच्या वतीने लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वरांना दुग्धाभिषेक करण्यात आला. परंपरेप्रमाणे या दुग्धाभिषेकानंतर महाशिवरात्री यात्रेचा शुभारंभ झाला. सिद्धेश्वराच्या दर्शनासाठी लातूर व पंचक्रोशीतील भाविकांनी मध्यरात्रीपासूनच रांगा लावल्या होत्या. सकाळी जिल्हाधिकारी व मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी दिवाणी न्यायाधीश गोटे व धर्मादाय सह आयुक्त राजेश सासणे, प्रशासक सचिन जांबुतकर आणि विश्वस्त उपस्थित होते.

लातूरसह सीमावर्ती भागात सिद्धेश्वरांची महाशिवरात्री यात्रा प्रसिद्ध आहे.या कालावधीत सिद्धेश्वरांचे दर्शन घेण्यासाठी तसेच यात्रेचा आनंद लुटण्यासाठी लाखो भक्त लातूर येथे येत असतात. शिवरात्रीपासून यात्रेला प्रारंभ होतो.



दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे गवळी समाजाच्या वतीने मध्यरात्री वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढत मंदिरात येऊन श्री सिद्धेश्वरांना दुग्धाभिषेक करण्यात आला. यानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून यात्रा महोत्सवाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. दिवाणी न्यायाधीश गोटे, सह धर्मादाय आयुक्त राजेश सासणे व प्रशासक सचिन जांबुतकर, ईशानी घुगे यांच्यासह ज्येष्ठ विश्वस्त विक्रमतात्या गोजमगुंडे,श्रीनिवास लाहोटी,अशोक भोसले, बाबासाहेब कोरे,नरेश पंड्या,सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह दिसेन, मन्मथ लोखंडे, चंद्रकांत परदेशी, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे आदींची यावेळी उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री सिद्धेश्वरांची महापूजा व महाआरती करण्यात आली. यावेळी विश्वस्त मंडळाकडून उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

दरवर्षीप्रमाणेच श्री सिद्धेश्वरांच्या दर्शवण्यासाठी भक्तांनी मध्यरात्रीपासूनच रांगा लावल्या होत्या. हर हर महादेव'चा जयघोष करीत भाविक-भक्त रांगा लावून दर्शन घेत होते.भक्तांना दर्शन घेण्यात कुठलीही अडचण येऊ नये यासाठी विश्वस्त मंडळाच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.दर्शन रांगा तसेच भक्तांना पिण्याचे पाणी उपलब्ध होते.दर्शन रांगेमध्ये आरोग्य विषयक समस्या निर्माण झाल्या तर उपचारासाठी वैद्यकीय पथकही तत्पर होते. देवस्थान व भालचंद्र रक्तपेढीच्या सहकार्यातून रक्तदान करणाऱ्यांना थेट दर्शन देण्याचा उपक्रम यावर्षीही राबविण्यात आला.या शिबिराला दर्शनासाठी येणारे भक्त,नागरिक व युवकांनी मोठा प्रतिसाद दिला.

यात्रा कालावधीत होणारी गर्दी लक्षात घेता पोलीस प्रशासनाच्या वतीने मंदिर परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

यात्रा कालावधीत विविध सोयी- सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीनेही व्यवस्था करण्यात आली आहे.

# कृषि विकासासाठी जैवतंत्रज्ञान आधारीत प्रगत संशोधन संसाधने आणि तंत्रज्ञानाचा वापर हि काळाची गरज प्रा.डॉ. इंद्र मणि

लातूर: जैवतंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली पुरस्कृत वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर येथे कृषि विकासासाठी अत्याधुनिक जैवतंत्रज्ञान संसाधने व तंत्रज्ञान या विषयावर दिनांक १४ फेब्रुवारी, २०२६ रोजी विचारमंथन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे कुलगुरू मा. डॉ. इंद्र मणि, मुख्य मार्गदर्शक जैवतंत्रज्ञान विषयाचे सेवानिवृत्त ख्यातनाम राष्ट्रीय प्राध्यापक डॉ. नागेंद्र कुमार सिंह, संचालक शिक्षण डॉ. भगवान आसेवार, संचालक संशोधन डॉ. खिजर बेग, अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, डॉ. अच्युत भरोसे, डॉ. संतोष कांबळे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे, गळीत धान्ये विशेषज्ञ डॉ. मोहन धुप्पे यांची प्रमुख उपस्थिती होती. विचारमंथन कार्यशाळेत विद्यापीठातील पिक पैदासकार, वनस्पतीशास्त्र, वनस्पती विकृतीशास्त्र व कीटकशास्त्र विभागातील प्राध्यापक, संशोधक व पदव्युत्तर विद्यार्थी असे एकूण ४१ संशोधक सहभागी झाले.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय वनस्पती जैवतंत्रज्ञान संशोधन केंद्राचे मा. राष्ट्रीय प्राध्यापक डॉ. नागेंद्र कुमार सिंह यांनी सर्व सहभागी संशोधकांना मार्गदर्शन केले. कृषि जैवतंत्रज्ञानाद्वारे डीएनए पातळीवर आधारित जनुकीय विकसित पिके, आण्विक जैवतंत्रज्ञान आधारित पिकांची प्रजनन प्रणाली, पिकांच्या वाणामध्ये अत्यंत कमी कालवधीत आवश्यक सुधारण्यासाठी डीएनए मार्करचा उपयोग, पिकांच्या वाणांची प्रयोगशाळेत डीएनए पातळीवर अचूक तपासणी, जैवतंत्रज्ञान आधारित अचूक रोग निदान प्रणाली, पिकांची प्रत सुधारण्यासाठी, हवामान-स्मार्ट पिकांच्या जाती विकसित करण्यासाठी जीनोम एडिटिंग सारख्या तंत्रज्ञानाचा वापर ई. शाश्वत व पर्यावरणपूरक कृषि विकासासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी सादरीकरणादरम्यान सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. इंद्र मणि म्हणाले कि, वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि मर्यादित संसाधने पाहता, कृषी विकासासाठी जैवतंत्रज्ञान, जीनोम व जनुक बदल आणि प्रगत संशोधन साधनांचा वापर ही काळाची खरी गरज आहे. यामुळे पीक उत्पादन वाढवणे, कीड-रोग प्रतिकारशक्ती विकसित करणे आणि पौष्टिक अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे शक्य झाले आहे, जे शाश्वत शेतीसाठी अनिवार्य आहे असेही प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. संचालक संशोधन डॉ. खिजर बेग यांनी मराठवाड्यातील पिकांमधील समस्या, त्यावरील जैवतंत्रज्ञान आधारित आवश्यक संशोधन याविषयी सादरीकरण करून सर्व संशोधकांनी जनुकीय पातळीवर संशोधन करणेकरिता तंत्रज्ञान आत्मसात करून त्याद्वारे विविध पिकांतील करावयाच्या सुधारणा याबाबत चर्चा करण्यात आली. संचालक शिक्षण डॉ. भगवान आसेवार यांनी महाविद्यालयातील विविध प्रकल्पांचे सादरीकरण करून विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थीनिंना जनुकीय पातळीवर पिक विविधतेचे गुणधर्म ओळखून त्याचे रुपांतर प्रचलित वाणामध्ये करून नवीन वाणांची निर्मिती करणे करिता मार्गदर्शन केले. याप्रसंगी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व जिनोमिक्स फौंडेशन, नवी दिल्ली यांचा जैवतंत्रज्ञान विषयक व अत्याधुनिक संशोधन करिता सामंजस्य करार करण्यात आला.

महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अच्युत भरोसे यांनी विचारमंथन कार्यशाळेचे प्रास्तविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रावणी नवले व विवेक वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. योगेश भगत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सारिका भालेराव, डॉ. राहुल चव्हाण, डॉ. रमेश ढवळे, डॉ. विद्या हिंगे, डॉ. दिप्ती वानखडे, सुरेखा आंबटवाड, सुरेश बिरादार, वीरभद्र दुरुगकर, अश्विनी गरड, अभिजित देखमुख, प्रतीक्षा जाधव, किशोर घोळवे, अंकिता इंगवले, प्रथमेश पवार, विनोद कदम यांनी विशेष परिश्रम घेतले.




# संत सेवालाल महाराज जयंती निमित्त अभिवादन

बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख

महाविद्यालय, बाभळगाव येथे महान समाजसुधारक व आध्यात्मिक मार्गदर्शक संत सेवालाल महाराज यांची जयंती अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रा. हरिहर गायके यांच्या हस्ते संत सेवालाल महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, ग्रंथपाल डॉ. महावीर कटके, डॉ. कांतराव पोले, प्रा. संदीपान चेवले, प्रा. ज्ञानदेव कांबळे, प्रा. सोपान डोपे, प्रा. अंकिता वाडकर, अंकुश थडकर यांची उपस्थिती होती. या जयंती समारंभास प्राध्यापकवर्ग व विद्यार्थ्यांनी संत सेवालाल महाराजांच्या विचारांना अभिवादन करत त्यांच्या समाजप्रबोधनात्मक कार्याचा गौरव केला. त्यांच्या जीवनातील साधेपणा, सत्यनिष्ठा व मानवतेचा संदेश आजच्या पिढीस प्रेरणादायी असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सर्वांनी संत सेवालाल महाराजांच्या विचारांचा अंगीकार करून सामाजिक सलोखा, समता व सद्भावना जोपासण्याचा संकल्प केला.

# परंडा येथील उपजिल्हा रुग्णालयात युनानी डे साजरा

परंडा (प्रतिनिधी) येथील उपजिल्हा रुग्णालयात युनानी डे वैद्यकीय अधीक्षक डॉ. आबरार पठाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हादि. ११ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला.

युनानी विभागाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. हाश्मी अब्दुल वदुद यांनी युनानी पॅथी म्हणजे वैद्यकशास्त्र ही प्राचीन ग्रीक परंपरेतून विकसित झालेली आणि पुढे अरब व पर्शियन विद्वानांनी समृद्ध केलेली उपचार पद्धती आहे. मानवाच्या शरीरातील चार प्रमुख द्रव्ये दम (रक्त), बलगम, सफरा (पित्तसदृश) आणि सौदा (कफसदृश) यांच्या संतुलनावर आरोग्य अवलंबून असते, अशी युनानीची संकल्पना आहे. तर उपचारांची त्रिसूत्री डॉ. वदुद यांनी युनानी पद्धतीतील तीन महत्त्वाच्या उपचार तत्त्वांची माहिती दिली. इलाज-बिल-गिझा (आहारोपचार) योग्य आहारानेच अनेक रोगांवर नियंत्रण ठेवता येते. इलाज-बिल-तदबीर (जीवनशैली उपचार): व्यायाम, मालिश, हिजामा (कपिंग थेरपी), स्टीम, विश्रांती इत्यादी पद्धतींनी शरीरशुद्धी व संतुलन साधले जाते. इलाज-बिल-दवा (औषधोपचार): नैसर्गिक वनौषधी व खनिज घटकांपासून तयार औषधे वापरली जातात. कोणत्या आजारांमध्ये उपयुक्त ? युनानी पॅथी विशेषतः त्वचारोग, सांधेदुखी, श्वसनाचे विकार, पचनसंस्था विकार, स्त्रीरोग व जीवनशैलीजन्य आजारांमध्ये प्रभावी ठरते. ही पद्धती रोग बरा करण्यासोबतच रोग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक आरोग्य संवर्धनावर भर देते. तसेच डॉ. आनंद मोरे, डॉ. अभिजीत खरटमल, डॉ. स्मिता पाटील यांनीही समन्वयी आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित केले. युनानी डे निमित्त पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक विज्ञान यांचा संगम साधून निरोगी समाजनिर्मितीसाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. जनतेने आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या युनानी सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी आरोग्य सेवक किशोर जगताप, आरोग्य मित्र रणखांब व इन्चार्ज सिस्टर कुलकर्णी व केसकर यांच्यासह रुग्णालयातील कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

पान १ वरून

## राजस्थानातील...

आगीची बातमी समजताच शेजारील कारखान्यांमधील कामगारांनी सुरक्षिततेसाठी बाहेर धाव घेतली. कारखान्याच्या मालकाने ही जागा भाड्याने दिली होती, जिथे भाडेकरू बेकायदेशीररित्या फटाके तयार करत असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. कारखान्यात मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेल्या दारूगोळा आणि कार्डबोर्डमुळे एका भीषण स्फोटानंतर आग झपाट्याने पसरली. खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला असून आसपासचे कारखाने रिकामे करण्यात आले आहेत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीदरम्यान ३ ते ४ मोठे स्फोट झाले, ज्यामुळे नागरिक आणि कामगारांमध्ये भीती निर्माण झाली. अग्निशमन दलाच्या जवानांनी तासनतास प्रयत्न केल्यानंतर आगीवर नियंत्रण मिळवले असून सध्या कुलिंग ऑपरेशन सुरू आहे.

## अर्थसंकल्पीय...

अशा परिस्थितीत ही कर्जमाफी झाल्यास शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर या हालचालींना मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे.

## शेतकरी नेते...

मी मुख्यमंत्री असतानाही कार्यकर्ता म्हणूनच काम केले आणि पुढेही कार्यकर्ता म्हणूनच काम करणार आहे. जो काम करेल तो पुढे जाईल आणि कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे; आमदार-खासदार-मंत्री कार्यकर्तेच घडवतात, असे त्यांनी सांगितले.

शंकरअण्णा धोंडगे यांच्या कामाचा उल्लेख करत शिंदे म्हणाले, धोंडगे हे आयुष्यभर शेतकरी चळवळीत काम करणारे नेतृत्व आहे. शेतकऱ्यांच्या वेदना आणि समस्या त्यांनी जवळून अनुभवल्या आहेत. मराठवाड्यात त्यांनी उभी केलेली संघटनात्मक ताकद मोठी आहे. अशा अनुभवी आणि लढाऊ नेतृत्वामुळे शिवसेनेची शेतकरी बाजू आणखी मजबूत होईल.

## छत्रपती शिवाजी...

डॉ. शिवनंदा लंगडापुरे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आंचल गोयल म्हणाल्या, या पदयात्रेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी शैक्षणिक संस्थांशी तत्काळ समन्वय साधून नियोजन करावे. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजनामधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. पदयात्रेत अधिकाधिक शासकीय अधिकारी, महिला, युवक आदी सहभागी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत. पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचा आराखडा करून योग्य अंमलबजावणी करावी.

रवींद्र नाट्य मंदिरात लोककल्याण राजा अर्थात शिवदर्शन नाटक

१८ फेब्रुवारी २०२६ रोजी रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी येथे सकाळी १०.३० वाजता लोककल्याण राजा अर्थात शिवदर्शन या विशेष नाटकाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देत त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि लोककल्याणकारी कारभाराचे दर्शन या नाटकातून घडविण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, खासदार अनिल देसाई, आमदार महेश सावंत, मुंबई महानगरपालिकेच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यावेळी उपस्थित राहणार आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रम

१९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर एशियाटिक सोसायटी ऑफ मुंबई टाऊन हॉल (सेंट्रल लायब्ररी), शहीद भगतसिंग रोड, फोर्ट येथून गेट वे ऑफ इंडिया पर्यंत पदयात्रा काढण्यात येणार आहे.

गेट वे ऑफ इंडिया येथे शिवरायांच्या जीवनपटावर आधारित विविध प्रयोगात्मक कला आणि सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहेत. सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## कुसुमाग्रजांच्या...

जागतिक स्तरावर विखुरलेल्या मराठी भाषिकांना एकत्र आणणे, मराठी भाषा व संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे तसेच नव्या पिढीत मराठीबाबत अभिमान निर्माण करणे हा या संमेलनाचा प्रमुख उद्देश असल्याचे मंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

शहराच्या सांस्कृतिक वैभवाला साजेसा सोहळा:

या संमेलनासाठी परदेशातून साहित्यिक हजर राहणार आहेत. यापूर्वीचे संमेलन पुणे येथे झाले. या संमेलनात पुस्तक आदान प्रदान हा आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात आला. या संमेलनातही हा उपक्रम व्यापक स्तरावर राबविण्यात येईल. त्यासाठी नाशिककरांनी आपले योगदान द्यावे. त्यासाठी दहा रुपये वर्गणी ठेवण्यात येईल. या संमेलनाच्या मुख्य मंडपाला कवी कुसुमाग्रज नगरी असे नामकरण करण्यात येईल. अन्य दालनांना मान्यवरांची नावे देण्यात येतील. मराठी भाषा गौरव दिन आणि ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या स्मृती दिन तसेच सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनाला विशेष महत्व असणार आहे. शहराच्या सांस्कृतिक वैभवाला साजेसा हा सोहळा ठरणार असून नाशिकची ओळख जागतिक स्तरावर अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

संमेलनाची रूपरेषा:

मराठी भाषा विभागातर्फे ३५ जणांना साहित्य पुरस्कार, विश्व मराठी संमेलनाचा साहित्य भूषण पुरस्कार व नाशिकमध्ये एक विशेष पुरस्काराचे वितरण या संमेलनात करण्यात येणार आहे. १७ फेब्रुवारी रोजी पुरस्कार्थींची नावे घोषित करण्यात येतील. संमेलन पूर्व २६ फेब्रुवारी रोजी मराठी बोलीभाषांचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे व सांगता मराठीतील प्रसिद्धी नाटक आमने-सामने याने होईल. २७ फेब्रुवारी रोजी कवी कुसुमाग्रज यांच्या निवासस्थानापासून शोभायात्रेने संमेलनाचा प्रारंभ होणार आहे. सांयकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. उद्घाटनापूर्वी पुरस्कार विजेत्यांबाबत परिसंवादाचे आयोजन केले आहे. २८ फेब्रुवारी रोजी मनाचे श्लोक, लोककला, चित्रपट कार्यशाळा, एआय व मराठी भाषा, वारकरी संप्रदाय साहित्यप्रकार असे नानाविध कार्यक्रम होणार असून प्रत्येक दिवशी कार्यक्रमाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने होणार असल्याचे उदय सामंत यांनी सांगितले.

## संस्कारक्षम पिढी...

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्था सचिव कालिदास माने यांनी उपस्थित पाहुण्यांना संस्थेचा आढावा देत संस्थेते घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाची तोंडओळख करून दिली. कार्यक्रमाचे संचलन शिवकांता मुर्गे व मीनाक्षी यादव यांनी केले, तर आभार प्राचार्य यू. एस. देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## नवोदय...

कांबले, महेश डोलारे, गणपत भिसे, सुनिल सौदागर, पिराजी साठे, विकास कांबळे, महादुभाऊ रसाळ, सचिंद्र कांबळे, शाम च्हाण, सुनिल बसपुरे, नुतन हनमंते, आश्विन कांबळे, महादेव मस्के, राजेंद्र लोदगेकर,राहुल क्षिरसागर,राज क्षिरसागर, आशोक मगर, विजय लोढे, रवी कदम, रवी शिदे, नागेश क्षिरसागर, रवी अर्जुने अनुष्का पाटोळेचे आई-वडील व नातेवाईक यांची उपस्थिती होती.मोर्चामध्ये न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

कुटुंबीयांच्या मते, अनुष्काच्या मृत्यूला आत्महत्या म्हणण्यासाठी कोणताही ठोस पुरावा नसून तिच्या हाताला झालेला फ्रॅक्चर, तळव्यांवरील काळे-निळे डाग आणि डोक्यावरील जखम यावरून तिला मारहाण करून हत्या करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. पोलिसांनी तपासाची दिशा बदलून खुनाच्या अनुषंगाने चौकशी करावी, अशी जोरदार मागणी मोर्चात करण्यात आली.

मोर्चेकऱ्यांनी प्रशासनाकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. त्यामध्ये माजी न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली निष्पक्ष चौकशी समिती स्थापन करणे, प्रकरण फास्टट्रॅक न्यायालयात चालवणे, संबंधित पदाधिकाऱ्यांची चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करणे, एसआयटी प्रमुख तपास अधिकारी बदलणे, मोबाईल सीडीआर तपासणे, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे आणि दोषींना कठोर शिक्षा देणे या प्रमुख मागण्यांचा समावेश आहे. मोर्चाचे नेतृत्व माजी नगरसेवक जी. ए. गायकवाड आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश चव्हाण यांनी केले. आंदोलन शांततेत पार पडले असले तरी अनुष्का पाटोळे प्रकरणात न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू राहणार असल्याचा इशारा आंदोलकांनी दिला.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादक: गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ वाढायला पाहिजे - गाडेकर

## धाराशिव ग्रंथोत्सव २०२५ चे थाटात उद्घाटन * ग्रंथ दिंडी ठरली मुख्य आकर्षण





धाराशिव (प्रतिनिधी)- आपणाला सर्व प्रकारचे ज्ञान गिळण्याचे ग्रंथ व साहित्य हे मुख्य साधन आहेत. ग्रामीण भाग हा वाचनाच्या चळवळीत पहिल्यापासूनच सक्रिय आहे. त्यांची सक्रियता अधिक तीव्र करण्यासाठी ग्रामीण भागात ग्रंथालय चळवळ जोमाने वाढायला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे संचालक अशोक गाडेकर यांनी दि. १४ फेब्रुवारी रोजी केले. वाशी शहरात आयोजित धाराशिव ग्रंथोत्सव २०२५ अंतर्गत बाल वारकऱ्यांची ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या दिंडीत विठ्ठल रुक्मिणी, संत तुकाराम, संत मिराबाई यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, महात्मा गांधी, महात्मा ज्योतिबा

फुले, माता सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आदी महापुरुषांच्या वेशभूषेत साकारलेली मिरवणूक हे ग्रंथोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले.

विद्या महाराष्ट्र व तंत्र ग्रंथालय वाशी येथील अजिंक्य मंदिर परिसरात महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत संचालनालय, राज्य, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव व तालुका ग्रंथालय संघ वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने या ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष व.ग. सुर्यवंशी अध्यक्षस्थानी होते. तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ. गजानन कोटेवार, वाशी नगर पंचायतच्या नगराध्यक्ष विद्याताई गायकवाड, छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, मराठवाडा विभागाचे प्रमुख कार्यवाहक राम मेकले, पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष विनोद गायकवाड, अजिंक्य विद्या मंदिराचे संस्थापक अध्यक्ष एस. एल. पवार, जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे, निरीक्षक शिवशंकर कटाळे, सुधाकर बुकन आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना अशोक गाडेकर म्हणाले की, सोशल मीडियामुळे तरुण पिढीचा बाचनाकडे कल कमी होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तालुकास्तरावर ग्रंथोत्सव साजरे करून सर्व प्रकारची पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देणी आवश्यक आहे. ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून वाचन संस्कृती जोपासण्याचे आणि वाढविण्याचे काम समाजाच्या हितासाठी व्हावे, असे आवाहन केले. अध्यक्ष व.ग. सुर्यवंशी यांनी ग्रंथालयामध्ये सर्व प्रकारची पुस्तके, विशेषतः स्पर्धा परीक्षांची पुस्तके उपलब्ध करून देण्याची गरज व्यक्त केली. वाचक चोखंदळ असावा आणि वाचकसंख्या वाढावी यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथील सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी सोशल मीडियाचे दुष्परिणाम तरुण पिढीसमोर मांडण्याची गरज व्यक्त केली. वाचनाच्या माध्यमातून पिढी घडते, तर सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. प्रा. डॉ. गजानन कोटेवार म्हणाले की, नी महात्मा गांधी यांना प्रत्यक्ष पाहिले नाही, मात्र ग्रंथांच्या माध्यमातून त्यांना आत्मसात केले. तरुणांना वाचनाच्या प्रवाहात आणण्यासाठी गावोगावी ग्रंथालय चळवळ जोमाने उभी राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शासनाच्या अभ्यासिकांप्रमाणे वाचनालयांमध्येही अभ्यासिका सुरू करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

प्रारंभी वाशी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरापासून बाल वारकरी विद्यार्थ्यांच्या ग्रंथ दिंडीरा प्रारंभ झाला. ढोल, हलगी, मृदुंग व टाळांच्या गजरात आणि जनजागृतीपर गीतांच्या निनादात ही दिंडी छत्रपती शिवाजी महाराज चौक, पारा चौक मार्गे कार्यक्रन स्थळी दाखल झाली, विद्यार्थ्यांनी लेझीम, टिपऱ्या, अभंग व इतर सादरीकरणातून वातावरणात चैतन्य निर्माण केले. ग्रंथोत्सव स्थळी दीपप्रज्वलन करून महामानवांना पुष्पहार अर्पण करण्यात आले आणि धाराशिव ग्रंथोत्सव २०२५ चे थाटात उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे यांनी केले. सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी तर आभार लक्ष्मीकांत पवार यांनी मानले. कार्यक्रमास ग्रंथालय चळवळीतील पदाधिकारी, कार्यक तें, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावंत यांनी केला महायुतीचा विश्वासघात – कुलकर्णी

धाराशिव (प्रतिनिधी) जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार भारतीय जनता पार्टीने संपूर्ण जिल्ह्यात महायुती म्हणून लढण्याचे निश्चित झाले होते. मात्र, आमदार तानाजीराव सावंत यांनी भूम, परंडा आणि वाशी या मतदारसंघांत महायुतीशी विसंगत भूमिका घेतली. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आदेश डावलून थेट काँग्रेस आणि शिवसेना (ठाकरे) यांच्याशी हातमिळवणी केली. महायुतीचा विश्वासघात करणाऱ्या सावंतांच्या या गंभीर कृत्याची फडणवीस आणि शिंदे यांच्याकडे तक्रार केली असल्याचा बाँब भाजपचे जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे सोडला आहे.

कुलकर्णी यांनी असे नमूद केले आहे की, जिल्ह्यातील पाच तालुक्यांमध्ये महायुतीने पूर्ण ताकदीनिशी एकजुटीने निवडणूक लढवली. मात्र, सावंतांच्या आडमुठ्या धोरणामुळे भूम-परांडा-वाशी भागात युती होऊ शकली नाही. या गद्दारीबाबत आम्ही फडणवीस व शिंदे यांना वेळोवेळी अवगत केले आहे. मतांच्या आकडेवारीतून सावंतांची 'फिक्सिंग' उघड झाली आहे. आ सावंत यांनी केवळ युती नाकारली नाही, तर महायुतीच्या अधिकृत उमेदवारा यांच्या विरोधात रसद पुरवल्याचा दावाही कुलकर्णी यांनी



केला आहे. पुराव्या दाखल त्यांनी लोकसभा आणि जिल्हा परिषद निवडणुकीत भूम-परंडा-वाशी तालुक्यातील मतांच्या फरकाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. भूम-परंडा-वाशी तून खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांना सुमारे दीड लाख मते मिळाली होती. जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना (ठाकरे) उमेदवारांना केवळ १५ हजार मते मिळाली आहेत. आ सावंतांनी त्यांची सगळी रसद लोकसभा निवडणुकीत तिकडे वळवली व खा राजेनिंबाळकर यांनी या निवडणुकीत त्यांची मते आ सावंतांच्या उमेदवाराकडे वळवली असल्याचा हा सगळ्यात मोठा पुरावा असून त्यांची छुपी युती व राजकीय वस्तुस्थिती आता जनतेसमोर उघडी पडली असल्याचे कुलकर्णी यांनी नमूद केले. तसेच निवडून आलेल्या जिल्हा परिषदेच्या ८ सदस्यांना आ सावंतांनी शिंदे यांच्याकडे नेण्याऐवजी स्वतःच्या ताब्यात ठेवले आहे. ही बाब अत्यंत गंभीर आणि संशयास्पद आहे. पक्षांतर्गत शिस्तीचा भंग करणारी असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणी वरिष्ठ नेत्यांकडे तक्रार आणि कडक कारवाईची मागणीही करण्यात आली आहे. महायुतीचा विश्वासघात करून विरोधकांना मदत करणाऱ्या सावंतांच्या भूमिकेची सविस्तर माहिती वरिष्ठ नेत्यांना देण्यात आली आहे. महायुतीतील कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या असून, जिल्ह्यातील मतदारांचा महायुतीवर असलेला विश्वास टिकवण्यासाठी फडणवीस व शिंदे यांनी त्वरीत कडक कारवाई करावी अशी आग्रही मागणीही कुलकर्णी त्यांनी केली आहे. महायुतीची एकजूट टिकवण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# शिवजन्मोत्सव समितीच्या बुध्दीबळ स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

## पावने दोनशे स्पर्धकांचा सहभाग, रात्रीपर्यंत चालल्या स्पर्धा

लातूर, प्रतिनिधी- छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंतीनिमित्त रविवारी (दि.१५) घेण्यात आलेल्या बुध्दीबळ स्पर्धेस स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १७५ स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून बुध्दीबळ अन लातूरची जणू वेगळी ओळखच दिली.



आर.एन मोटेगावकर विद्यालयात झालेल्या या स्पर्धेचे उदघाटन मोटेगावकर स्कुलच्या संचालिका मिनल मोटेगावर यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पुजनाने व दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रध्दासुमने अर्पण करुन झाले. अध्यक्षस्थानी आरटीओ प्रमोद सरोदे होते. शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, ॲड. उदय गवारे, ॲड. शिवकुमार जाधव, डी.एस. पाटील, प्राचार्य नेताजी जाधव, बुध्दीबळ प्रशिक्षक श्रीराम

साने, अविनाश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मीनल मोटेगावकर यांनी महापुरुषांच्या जयंत्यांना सामाजिक बांधिलकीची जोड देत समिती घेत असलेले कार्यक्रम व राबवत असलेले उपक्रम दिशादर्शक असल्याचे सांगत खेळाडुंनी खिलाडू वृत्ती बाळगळी पाहीजे असे नमुद केले. श्रीराम साने यांनी विद्यार्थ्यांसाठी शिवजन्मोत्सव समिती राबवत असलेल्या उपक्रमाचे कौतूक करीत समितीप्रति कृतज्ञता व्यक्त केली. आरटीओ सरोदे यांनीही मनोगत व्यक्त केले.

परिक्षक म्हणून श्रीराम साने, अमित बियाणी, अण्णासाहेब साठे श्रीकांत मंत्री, विकी महेंद्रकर, पूजा शेळके यांनी काम पाहिले. प्रास्ताविक ॲड. उदय गवारे यांनी केले सुत्रसंचालन भीम दुनगावे यांनी केले. डी.एस. पाटील यांनी आभार मानले. सकाळी दहा वाजता सुरू झालेल्या स्पर्धा रात्री सात वाजेपर्यंत चालल्या. स्पर्धकांत खूप उत्साह होता. त्यांच्यासाठी त्यांच्या पालकांनीही दिवसभर स्पर्धास्थळी बैठक दिली होती.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयास राज्य शासनाचा ऊर्जा संवर्धनाचा सलग तिसऱ्यांदा पुरस्कार

## सलग तिसऱ्यांदा राज्य ऊर्जा संवर्धनाचा मान : दयानंद विज्ञान महाविद्यालयाची राज्यात भरीव कामगिरी

लातूर : दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयांनी ऊर्जा संवर्धन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा १८ वा राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार (२०२४-२५) सलग तिसऱ्यांदा पटकावला आहे. हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा )यांच्या वतीने प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयाने ऊर्जेची केलेली बचत, प्रभावी एनर्जी ऑडिट, सौरऊर्जा व इतर पर्यायी ऊर्जास्रोतांचा वापर तसेच विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजात ऊर्जा संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे हा प्रतिष्ठेचा सन्मान मिळविला आहे. दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली ऊर्जा संवर्धनाचे नियोजनबद्ध काम करण्यात आले. शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, ऊर्जा संवर्धन समन्वयक डॉ. कोमल गोमारे, एनर्जी ऑडिटर केदार खमितकर व किरण खमितकर यांनीही या उपक्रमात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

महाविद्यालयात शाश्वतता, ऊर्जा कार्यक्षमता आणि आधुनिक शिक्षणपद्धती यांना प्राधान्य देत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.सोलार पॅनल सिस्टीम आहे.पारंपरिक उच्च तीव्रतेच्या दिव्यांवरील प्रोजेक्टरऐवजी ऊर्जा-बचत करणारे एलईडी स्मार्ट बोर्ड बसविण्यात आले असून त्यामुळे वीज वापरात लक्षणीय बचत होत आहे.अध्यापन अधिक प्रभावी व संवादात्मक झाले आहे.कार्यशाळा व शैक्षणिक उपक्रमांसाठी सुसज्ज वातानुकूलित सेमिनार हॉल उपलब्ध असून संशोधन प्रयोगशाळांमध्ये पाच-तारांकित दर्जाची ऊर्जा-कार्यक्षम उपकरणे वापरात आहेत.अत्याधुनिक शैक्षणिक व संशोधनाधारित सॉफ्टवेअरचा वापर करून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते.




ऊर्जा संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ऊर्जा जनजागृती व्याख्याने, कर्मचारी बैठकीत ऊर्जा प्रतिज्ञा सत्र, सादरीकरणे तसेच Last Out? Lights Out! सारख्या स्मरण फलकांची स्थापना करण्यात आली आहे.स्विच व प्रयोगशाळांजवळ जबाबदार ऊर्जा वापराचे संदेश देऊन वर्तनात्मक बदल घडविण्यावर भर दिला जात आहे. या सर्व उपक्रमांमुळे महाविद्यालयात ऊर्जा बचतीची सशक्त आणि पर्यावरणपूरक संस्कृती विकसित झाली आहे.

यापूर्वीही महाविद्यालयाने राष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले आहे. सन २०२२ मध्ये भारत सरकारच्या विद्युत मंत्रालयातर्फे प्रदान करण्यात येणारा 'राष्ट्रीय ऊर्जा संरक्षण पुरस्कार' प्रथम क्रमांकाने मिळाला होता. हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. तसेच ऊर्जा कार्यक्षमतेतील अनुकरणीय कार्याबद्दल १४ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात 'राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार-२०२५' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार केंद्रीय ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर व ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या हस्ते प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड यांनी स्वीकारला होता.

दयानंद विज्ञान महाविद्यालयास यापूर्वी सन २०२०-२१ मध्ये १६ वा आणि सन २०२१-२२ मध्ये १७ वा राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन पुरस्कार जाहीर करण्यात आला होता. त्या यशाची परंपरा कायम राखत २०२४-२५ चा १८ वा पुरस्कार जाहीर झाला आहे.

ऊर्जा संवर्धन हे प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. ऊर्जेचा अपव्यय टाळून पर्यावरणपूरक उपाययोजना राबविणे ही काळाची गरज असल्याची जाणीव ठेवून दयानंद विज्ञान महाविद्यालयाने कृतीशील पावले उचलली आहेत. सलग तिसऱ्यांदा मिळालेल्या या सन्मानामुळे प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा उत्साह द्विगुणित झाला असून समाजात ऊर्जा बचतीचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक व संपूर्ण टीमचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. ऊर्जा संवर्धन हीच काळाची गरज हा संदेश अधोरेखित करत महाविद्यालयाने राष्ट्रीय व राज्यस्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# माता भिमाई आंबेडकर जयंती निमित्त जवळ्यात अभिवादन

## भारतीय बौद्ध महासभा पदाधिकारी आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभाग

नांदेड प्रतिनिधी: लोहा तालुक्यातील तसेच नांदेड दक्षिण मतदार संघातील सोनखेड सर्कल अंतर्गत येत असलेल्या, जवळा (दे) या गावांमध्ये विश्वशांती बुद्ध विहार जवळा या ठिकाणी माता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभा नांदेड जिल्हा संरक्षण सचिव आनंद गोडबोले, रमाई जयंती मंडळ अध्यक्षा भारतबाई विठ्ठल निखाते, बौध्दचार्य भा.बो.म.सभा ग्राम शाखा अध्यक्ष सुरेश गोडबोले, भिम जयंती मंडळाचे अध्यक्ष भिमराव गोडबोले, मा.ग्रा.प.सदस्य वसंत गोडबोले, अभियंता वनमाला सुनील वाळवंटे, ग्राम शाखा संस्कार सचिव सुरज कैलास गोडबोले यांच्यासह भारतीय बौद्ध महासभा पदाधिकारी आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागाने कार्यक्रम घेण्यात आला.



परमपूज्य बोधिसत्व, भारतीय घटनेच्या शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मातोश्री भिमाबाई रामजी आंबेडकर यांच्या जयंती दिनाच्या अनुषंगाने असे संस्कार आपल्या पाल्यांवर घडविणाऱ्या माता सध्याच्या परिस्थितीमध्ये घडल्या पाहिजे. आणि नवीन येणाऱ्या पिढीमध्ये विद्वान विद्यार्थी ,चिमुकले घडले पाहिजे. असा प्रांजळ उद्देश ठेवून,माता भिमाई रामजी आंबेडकर यांच्या १७२ व्या जयंतीनिमित्त धम्मयान या दिनदर्शिकेप्रमाणे साजरी करण्यात आली. विश्वशांती बुद्ध विहार जवळा आणि भारतीय बौद्ध महासभा यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये प्रथम गौतम बुद्ध, माता भिमाई व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पुष्प अर्पण करून दिपाने व धुपाने पुजा करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सामुदायिक वंदना घेऊन माता भिमाई यांच्या संस्काराची जाणिव करुन दिली. दि.१४ फेब्रुवारी १८५४ रोजी माता भिमाबाई धर्मा पंडित (मुरबाडकर) यांचा जन्म आंबेटेंबे तालुका मुरबाड जिल्हा ठाणे येथे झाला होता. त्यांचे वडील धर्मा पंडित (मुरबाडकर) हे मराठा फलटणीत सुभेदार होते. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा विवाह १९ वर्षीय रामजी सकपाळ (आंबेडकर) यांच्याशी झाला. व त्यांचे १४ वे अपत्य ज्ञानसुर्य, ज्ञानाचे प्रतीक डॉ भिमराव रामजी आंबेडकर होते. याची जाणीव आनंद गोडबोले यांनी लेख वाचन करुन दिली.

यावेळी कार्यक्रमाच्या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा संरक्षण सचिव तथा आकाशवाणी प्रासंगिक निवेदक आनंद पुरभाजी गोडबोले, भिम जयंती अध्यक्ष भिमराव चांदु गोडबोले, रमाई जयंती मंडळ अध्यक्षा भारतबाई विठ्ठल निखाते, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेश गोडबोले,पंकज पुरभाजी गोडबोले, उपासक सुरज कैलास गोडबोले, सुंदराबाई पुरभाजी गोडबोले, सम्राट मिलिंद गोडबोले , साक्षी गोडबोले, अपेक्षा गोडबोले, शाश्वती गच्चे, कावेरी गच्चे, सुरज पंडित,वैभव ननुरे , सचिन झिंझाडे ,विराज हाटकर यांच्या सह भारतीय बौद्ध महासभा ग्रामशाखा, विध्यार्थी भिमजयंती मंडळ, विश्वशांती बुद्ध विहार कमिटी, डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, माता रमाई जयंती मंडळ , उपासक उपासिका व बालक बालिका यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# जन्म सार्थकी लावण्यासाठी व स्वप्नपूर्तीसाठी झटत रहावे – डांगी

मुरुम (प्रतिनिधी)- ज्ञान आणि कौशल्याच्या आधारे जीवनात उत्कर्ष साधता येतो. तुम्हाला मिळालेला जन्म सार्थकी लावण्यासाठी मोठी स्वप्ने पहा व स्वप्नपूर्तीसाठी निरंतर झटत रहावे, असे आवाहन पुणे येथील सी.ए. राजेंद्र डांगी यांनी केले.

मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात महाविद्यालयातील वाणिज्य विभाग आयोजित आत्मनिर्भरता आणि वाणिज्य शाखेतील व्यवसायाच्या संधी या विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. पुढे बोलताना डांगी म्हणाले की, प्रत्येकाने स्वप्ने पाहिली पाहिजेत. परंतू, ती स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आपल्याकडे किमान कौशल्ये असणे गरजेचे असते. जन्माने सर्व सारखेच असून कर्माने माणूससमोठा होतो. मोठे होण्यासाठी आधुनिक शिक्षण घेत उंबरठा ओलांडावा लागतो. वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मोठ मोठ्या कंपन्या, लघु उद्योग, व्यापारी मॉल्स, स्टेशनरी यांना आता लेखापालाची गरज

भासत असून ही देखील गरज फक्त वाणिज्यांचे विद्यार्थीच पूर्ण करू शकतात. आता प्रत्येक व्यापाऱ्याला सरकारने हिशेब ठेवणे आवश्यक केले आहे. तसेच जी.एस.टी. फाईल करणे, इनकम टॅक्स रिटर्न फाईल करणे, व्यवसाय कर भरणे. टी. डी. एस.पी. एफ., पी. टी. इ. भरवाच लागतो. यासाठी कॉमर्सच्या विद्यार्थचीच गरज असते. त्यामुळे कॉमर्स हे खूप मोठे क्षेत्र असून दरवर्षी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. यासाठी विद्यार्थानी पदवी घेतल्यानंतर असा कोर्स कारायला पाहिजे की ज्यामुळे त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. यासोबतच विद्यार्थ्यांनी कौशल्याभिमुख कोर्स करून आत्मनिर्भर व्हायला पाहिजे या यासाठी विद्यार्थ्यांमध्ये पाच प्रकारचे कौशल्य असणे गरजेचे आहे. त्यामध्ये अनुभव कौशल्य, प्रैक्टिकल कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, टेक्नॉलॉजी कौशल्य व सॉफ्ट स्किल कौशल्याचा समावेश आहे. कोणत्याही

क्षेत्रात जाण्यापूर्वी त्या क्षेत्रातील संधी, तेथील सुरक्षितता, त्या क्षेत्राचे भविष्य आदी बाबी तपासल्या पाहिजेत. वाणिज्य शाखेत व्यवसायाच्या अनेक संधी असूनआयुष्य उन्नत करण्यासाठी त्या मिळविल्या पाहिजेत, असेही त्यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. रविद्र गायकवाड म्हणाले की, विद्यमान काळात कौशल्याधारित शिक्षणाची गरज निर्माण झाली आहे. आजचे जग हे झपाट्याने बदलत आहे. जिथे पोट भरणार नसेल तिथे वेळ वाया घालने परवडणारे नसून वाणिज्य शाखेतील नव्या संधी शोधा, आर्थिक हित साधणाऱ्या व्यवसायाकडे वळा, असेही आवाहन त्यांनी सांगितले. यावेळी वाणिज्य विभागाचे डॉ. सुधीर पंचगल्ले, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. सुजित मटकरी, प्रा. भुषण पाताळे वाणिज्य विभागाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्याचा परिचय व प्रास्ताविक डॉ. रविद्र गायकवाड यांनी तर आभार डॉ. सुधीर पंचगल्ले यांनी मानले.

# मोईज सितारी यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार




**दै. अदिती एक्सप्रेस**

निलंगा (प्रतिनिधी): निलंगा जिल्हा लातूर येथील साप्ताहिक जनता एक्सप्रेस चे संपादक मोईज जमिरोद्दीन सितारी यांना नुकताच - पुणे येथे महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स तर्फे आयोजित भव्य कार्यक्रमात राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स वतीने झालेल्या कार्यक्रमात राज्यातील मुस्लिम समाजातील नुतन महानगरपालिका नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचे व उत्कृष्ट पत्रकारिता करणारे समाजातील पत्रकारांचे मान्यवरांची उपस्थितीत पुरस्कार मान्यवरांच्याहस्ते देण्यात आला. सन्मानचिन्ह,, मानपत्र, शाल-फेट - देऊन सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्रातील नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका, पंचायत आणि जिल्हा परिषद यांच्या निवडणुका पार पडल्या या निवडणुकांमध्ये मुस्लिम समाजातील उमेदवार निवडून आले असून सर्व विजयी उमेदवारांचा पुण्यातील आझम कॅम्पस मध्ये महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्सच्या वतीने भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते .कार्यक्रमाचे संयोजन मुस्लिम कॉन्फरन्सचे संस्थापक अध्यक्ष हाजी जुबेर मेमन यांनी केले होते.

याप्रसंगी महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्सचे संस्थापक अध्यक्ष हाजी जुबेर मेमन, कारी इद्रिस अन्सारी,फरीद खान पुणे शहर अध्यक्ष,महाराष्ट्र मुस्लिम कॉन्फरन्स, कलाकार आसिफ अलबेलामालेगाव कारी मुद्दसिर,अँड.सुलतान शहा, कारी जमील, ईलहाजोद्दीन फारुखी,अखिल भारतीय उर्दू शिक्षक संघटना राष्ट्रीय अध्यक्ष.,कामील शेखआदिल पब्लिकेशन इकबाल अन्सारी,मजहर शेख, अक्रम मदारी आदी उपस्थित होते. पुणे,नाशिक,सोलापूर,लातुर कोल्हापूर,मिरज,मुंबई,ठाणे, धाराशिव,अहील्या नगर, रत्नागिरी,संभाजी नगर सह विविध भागातील नगरसेवक आणी पंचायत,जिल्हापरिषद सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इकबाल अन्सारी यांनी केले तर आभार पुणे शहर महिला अध्यक्ष फरहीन सय्यद यांनी मानले.



# साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर: अवंती नगर येथील साने गुरुजी प्राथमिक विद्यालयात शुक्रवार,दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या बहारदार नृत्याने व विविध कलागुणांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन लातूरच्या नवनिर्वाचित महापौर श्रीमती. जयश्रीताई सोनकांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष *श्री. गोविंदराव माने* हे होते , तर प्रमुख अतिथी म्हणून श्री. भालचंद्र सोनकांबळे व एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भाऊसाहेब खंदारे उपस्थित होते .

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत संस्था सचिव कालिदासजी माने यांनी शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी पालकांची काय भूमिका आहे याविषयी मार्गदर्शन केले .

विद्यार्थ्यांच्या शारीरिक , मानसिक व बौद्धिक विकासाबरोबरच सांस्कृतिक विकास होणे ही गरजेचे आहे . प्रत्येक विद्यार्थ्याच्या अंगी कला गुण असतात आणि अशा कलागुणांना सादर करण्यासाठी व्यासपीठ प्राप्त करून देण्याचे काम वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून केले जाते .

असे प्रतिपादन प्रमुख अतिथी पोलीस निरीक्षक श्री. भाऊसाहेब खंदारे यांनी केले .

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष भागवत माने , संस्था सचिव कालिदासजी माने , सचिवा श्रीमती सुरेखाताई माने , प्रशासकीय अधिकारी श्रीमती उषा आडे , प्रशासकीय अधिकारी नागोराव कांबळे उपस्थित होते . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश परळे यांनी केले तर आभार गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे यांनी मानले . या स्नेह मेळाव्यात विद्यार्थ्यांनी गणेश वंदना , वारकरी गीत, रामायण, नटराज वंदना, छत्रपती संभाजी महाराज जीवनगाथा , तामिळनाडूतील प्रसिद्ध लोकनृत्य करकटम , शेतकरी गीत , लावणी , गोंधळ, इत्यादी गीतांवर अतिशय सुंदर नृत्य सादर केले . या स्नेहसंमेलनात साने गुरुजी शैक्षणिक संकुलातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक , शिक्षक , पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# श्री शंभुलिंग विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर, प्रतिनिधी : गिरवलकर नगर येथील श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित श्री शंभुलिंग शिवाचार्य माध्यमिक विद्यालयात गुरुवार, दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पी. जी. पाटील होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव यांच्या कन्या प्रा. रेणुका माधवराव पाटील (टाकळीकर), सौ. हर्षदा जोशी, अश्विनी धानोरे, बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापक देवासे सर तसेच विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी कु. कल्पना पांडुरंग पाटील (सहाय्यक प्राध्यापक, शासकीय आयटीआय, सोलापूर) उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा शिक्षक घुगे ए. पी. यांनी केले.

प्रमुख अतिथी सौ. हर्षदा जोशी यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याबाबत मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थिनी कु. कल्पना पाटील यांनी विद्यालयाने दिलेल्या संस्कारांमुळेच आज आपण चांगल्या पदावर कार्यरत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. प्रा. रेणुका माधवराव पाटील (टाकळीकर) यांनी दहावीनंतर योग्य अभ्यासक्रमाची निवड कशी करावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापिका पाटील पी. जी. यांनी विद्यार्थ्यांनी कोणताही ताण न घेता परीक्षेला सामोरे जावे, पुरेशी झोप घ्यावी व सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा असे सांगितले. तसेच विद्यालयाचा शंभर टक्के निकाल लागण्यासाठी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास करावा, असे आवाहन त्यांनी केले. मनोगत व्यक्त करताना इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक महाजन यू. बी. यांनी विद्यार्थ्यांना हसत-खेळत परीक्षेला सामोरे जाण्याचा सल्ला दिला. विज्ञान विभाग प्रमुख इजारे डी. सी. व हिंदी विषयाचे बंडगर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा शंभुलिंग भूषण पुरस्कार इयत्ता दहावीतील कु. इंगळे संतोषी ज्ञानेश्वर आणि चि. ढगे अभिजीत हनुमंत यांना प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख श्रीमती आरदवाड मॅडम व इयत्ता नववीतील विद्यार्थिनींनी केले, तर आभार प्रदर्शन कु. मुसळे सिद्धी यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दयानंद मध्ये इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज ची स्थापना



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर: दयानंद शिक्षण संस्थेचा नुकताच इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज (इन्क्यूब फार्मा, पुणे) या नामांकित कंपनीशी सामंजस्य करार (एम.ओ.यू ) करण्यात आला. पुणे येथिल इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज ( इन्क्यूब फार्मा प्रायव्हेट लिमिटेड ) या कंपनी बरोबर करार झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन, मेडिकल कोडिंग, फार्माकोव्हिजिलन्स, रेग्युलेटरी अफेअर्स हे कोर्सेस आहेत. या माध्यमातून करिअर गाईडन्स व भविष्यातील नोकरी संधींसाठी हे करार उपयुक्त ठरणार आहेत. इन्क्यूब फार्मा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी महाविद्यालयांशी सहकार्य करून प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्यासाठी सीएसआरसाठी निधीचा वापर करते. या प्रयोगशाळे अंतर्गत सॉफ्टवेअर आणि आरोग्यसेवा आणि जीवन विज्ञान (LS) क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र (COE) ची स्थापना, जे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) उपायांसह एकत्रित केले जाईल. तसेच कंपनी विद्यार्थ्यांसाठी प्रायोजित प्रकल्प, रिअल टाइम केस स्टडीज आणि समस्या विधान आणण्याची योजना आखत आहे. कंपनी प्रथम वर्षापासून अंतिम वर्षापर्यंतच्या सर्व शाखांसह विद्यार्थ्यांसाठी प्रमाणन अभ्यासक्रम, अॅड-ऑन कार्यक्रम, प्रशिक्षण आणि इंटर्नशिप संधी डिझाइन करते, ते महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची कौशल्ये आणि उद्योग संरेखन मजबूत करण्यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDPs) देखील देते.

इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज कडून प्रतिनिधी शार्दूल भोसले ( हेड सी.एस.आर अँड कॉलेज कोलॅबरेशन) आणि आतिष जाधव ( हेड ऑफ प्लेसमेंट अँड कॉर्पोरेट कोलॅबरेशन ) उपस्थित होते. दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक आणि विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड आणि शिक्षण संस्थेचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. अनिल बिरादार यांनी या करारासाठी पुढाकार घेतला.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी या करारासाठी अभिनंदन केले.

# जवळगा येथील देवणी जातीची गाय महा पशुधन एक्स्पोमध्ये सर्वप्रथम



**दै. अदिती एक्सप्रेस**

वलांडी प्रतिनिधी- देवणी तालुक्यातील जवळगा येथील प्रगतिशील पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांच्या देवणी जातीच्या गायीने प्रथम क्रमांक पटकावत गावाचे नाव पुन्हा एकदा राज्यभर उज्ज्वल केले आहे.

परळी वैजनाथ येथे संपन्न झालेल्या महा पशुधन एक्स्पोमध्ये या स्पर्धेत राज्यातील राज्यभरातील नामांकित पशुपालकांनी सहभाग घेतला होता. कडवी चुरस असतानाही धोंडीराम सुर्यवंशी यांच्या देवणी गायीने आपल्या तंदुरुस्ती, सशक्त पायांची रचना आणि दुधाळ क्षमतेमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले.उत्कृष्ट बांधा, संतुलित शरीररचना, उच्च दूध उत्पादन क्षमता आणि शुद्ध वाण वैशिष्ट्यांच्या आधारे परीक्षकांनी या गायीची निवड केली असल्याचे त्यांनी सांगितले.विजेत्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.यापूर्वी पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांच्या गायीने देशपातळीवर दिल्ली,मद्रास,बेंगलोर,सिंधुदुर्ग अशा ठिकाणी सहभाग घेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे.त्यांना उत्कुष्ठ गोपालक पशुसंवर्धन विषयक आवड म्हणून तत्कालीन जिल्ह परिषद अध्यक्ष दिलीपराव देशमुख व सभापती अण्णासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला होता.

त्यानिमित्ताने जवळगा येथे ग्रामस्थाच्यावतीने पशुपालक धोंडीराम सुर्यवंशी यांचा जेष्ठ नागरिक माजी पंचायत समिती सदस्य वामनराव पाटील यांच्या हस्ते शाल,हार,फेटा बांधून सत्कार करण्यात आला.यावेळी शेतकरी मुरलीधर बोकडे यांनी गायीसाठी शेंगदाणा पेंड दिली.माजी सरपंच ब्रम्हानंद रेड्डी, चेअरमन शेषेराव पाटील, विजयकुमार पाटील, अनिल पाटील,यशवंत सोनकांबळे, यज्ञेश्वर बिरादार, बसवराज स्वामी, राजकुमार मुळे, भागवत मुळ्जे , विवेकानंद जाधव,माधव गंभीरे, संगाप्पा कुंभार , विलास श्रीमंगले, बालाजी गंभीरे, रंगराव सौदागर आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लिंगाप्पा कुंभार,रामलिंग शिरसे, किशोर सौदागर यांनी प्रयत्न केले.धोंडीराम सुर्यवंशी यांच्या या यशामुळे जवळगा परिसरात आनंदाचे वातावरण असून, देवणी जातीच्या संवर्धनाला नवे बळ मिळाले आहे.

## लातूर येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त १८ रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

लातूर, दि. १६ : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि लातूर जिल्हा प्रशासनाच्यावतीने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर येथील बार्शी रोडवरील दयानंद सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे. यावेळी 'आम्ही जिजाऊच्या लेकी' या कार्यक्रमांतर्गत शिवचरित्र, शाहिरी पोवाडे, स्फुर्तीगीते व लोकगीतांचे सादरीकरण केले जाणार आहे. या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांची गौरवगाथा, त्यांचा पराक्रम व प्रेरणादायी जीवन नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून होणार आहे. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन लातूर जिल्हा प्रशासनाने केले आहे.



# शैक्षणिक सहलीसाठी भूतमुगळीतील पाच विद्यार्थी केरळकडे रवाना

**दै. अदिती एक्सप्रेस**

निलंगा प्रतिनिधी :-जिल्हा परिषद लातूर तर्फे आयोजित शैक्षणिक अभ्यास दौऱ्यासाठी केरळ येथे जाण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भूतमुगळी येथील पाच विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

पूर्वी निलंगे, राधिका सुरवसे, ओम हासुरे, पल्लवी चव्हाण आणि अथर्व लोंढे या विद्यार्थ्यांचा या शैक्षणिक सहलीसाठी समावेश झाला असून ते आज लातूर येथून रेल्वेने केरळकडे रवाना झाले.

या निवडीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून लातूरचे माध्यमिक शिक्षणाधिकारी मठपती साहेब, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी पवार साहेब शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री बेळकीरे,सहशिक्षक सुनील टोम्पे विनायक गायकवाड, कुमार बोयने, सत्यजित हिरास, संचय जमादार, रेखा कार्लेकर, दीपिका कुलकर्णी तसेच गावकऱ्यांनी त्यांना शुभेच्छा देत निरोप दिला.

# शिवजन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

## विविध कलागुणांच्या कार्यक्रमात सहभाग घेण्याचे समीतीचे आवाहन

**भागवत गोरे**

कंधार- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवानिमित्त कंधार शहरात विविध कार्यरमाचे आयोजन करण्यात आले आहे.यातील कलागुण च्या कार्यक्रमात कलाकारांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन जन्मोत्सव समितीने केले आहे.



कंधार तालुका सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीने दि.१५ फेब्रुवारी रोजी पत्रकारांशी संवाद साधला.यावेळी समितीचे अध्यक्ष विनोद तोरणे,सचिव परमेश्वर जाधव,सहकोषाध्यक्ष भगवान गिरे,संभाजी ल डेकर,त्रिभुवन मोरे,शिवाजी तोंडचिरे,नितीन कोकाटे यांची उपस्थिती होती.

दि.१७ फेब्रुवारी रोजी विविध कलागुणांचा कार्यक्रम होणार आहे.यात १ वी ते ७ वी व ८ वी ते १२ वी असे दोन शालेय गट असून या कलागुणात सहभागी होण्यासाठी मोफत प्रवेश आहे. प्रथम,द्वितीय व तृतीय असे क्रमांकासाठी रोख बक्षिसे मिळणार आहेत.दि.१८ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाशेजारी फटाक्यांची भव्य आतिषबाजी करण्यात आहे आहे.

दि.१९ फेब्रुवारी रोजी सकाळी सकाळी १० वाजता शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचा दुग्ध अभिषेक महंत अवधूत गिरी गणेश गीर महाराज मठ संस्थान डोंगरगाव बचोटी व श्री संत नामदेव महाराज बारूळकर मठ संस्थान बारूळ या गुरुवार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.दुपारी २ वाजता छ.संभाझी महाराज यांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेचे भूमिपूजन श्री संत नामदेव महाराज मठ संस्थान उमरज चे मठाधिपती एकनाथ गुरु नामदेव महाराज यांच्या अध्यक्षतेखाली कंधार लोहा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येणार आहे.तर दुपारी ३ वाजता बालाजी मंदीर भवानी नगर कंधार येथून आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते उद्घाटन होऊन येथून भव्य मिरवणूक निघणार असून ती महाराणा प्रताप चौक-माईचे मंदीर साठे नगर मार्गे शिवाजी महाराज स्मारकाजवळ मिरवणूकीची सांगता करण्यात येणार आहे.



# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात भारतीय समाज सुधारक सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहात संपन्न

लातूर / प्रतिनिधी- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, जयंती उत्सव समिती आणि आस्थापना विभाग, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांची जयंती महाविद्यालयातील प्राचार्य कक्षात उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, प्रो. डॉ. संजय गवई, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि के. आर. कोळी यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम भारतीय समाज सुधारक क्रांतिसिंह सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी सेवालाल महाराज यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. त्यानंतर प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर आभार प्रा. नितीन वाणी यांनी मानले.